ई-मेलद्वारे : तात्काळ

जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार),
मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८४५११६ Email ID :- napu15.mhpds@gov.in

क्रमांक:-तक्रार- ४३२६ /प्र.क्र.२०४/ना.पु-१५ दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२६

प्रति,

१) उप आयुक्त (पुरवठा),
नाशिक विभाग, नाशिक.

विषय :- तहसिल कार्यालय, श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथील संबंधित निरीक्षण अधिकारी (पुरवठा) व पुरवठा निरीक्षक यांच्याविरध्दच्या तक्रारीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत श्री. युवराज विठ्ठल पळसकर मु.पो.टाकळी लोणार, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर यांनी सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडे केलेले दि.१४.१०.२०२६ रोजीचे निवेदन सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. (कृपया अवलोकन व्हावे).

२. सदर निवेदनात प्रामुख्याने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थी/रेशन कार्डधारक कुटुंबाच्या संख्येबाबत माहितीच्या अधिकारातून प्राप्त माहिती व RCMS प्रणालीवरील माहितीमध्ये आढळणाऱ्या गंभीर तफावतीची चौकशी करून संबंधीत अधिकाऱ्यांवर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत मागणी केलेली आहे.

३. सबब, सोबत जोडलेल्या निवेदनातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करुन सविस्तर अहवाल आपल्या स्वंयस्पष्ट अभिप्रायासह शासनास दि.१२.११.२०२६ पर्यंत सादर करावा, ही विनंती.

(महेश जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सहपत्र: वरीलप्रमाणे

प्रत,१) जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांना उचित कार्यवाहीस्तव

२)कक्ष अधिकारी, संगणक कक्ष, अ.ना.पु.व.ग्रा.सं. विभाग, यांना उचित कार्यवाहीस्तव.

३)निवडनस्ती (ना.पु.-१५)

॥ सत्यमेव जयते ॥

श्री युवराज विठ्ठल पळसकर

मु.पो.टाकळी लोणार, ता.श्रीगोंदा,
जि.अहिल्यानगर ४१३ ७०१
yuvrajpalasakar617@gmail.com
palaskaryuvraj1575@gmail.com
मो. 77982 41716

जा.क्र.: 420/2026

दि. 14/10/2026

प्रति,
मा. सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

विषय : १.राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थी/रेशन कार्डधारक कुटुंबांच्या संख्येबाबत माहितीच्या अधिकारातून प्राप्त माहिती व RCMS प्रणालीवरील माहितीमध्ये आढळणाऱ्या गंभीर तफावतीची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत.
२. सदर संबधित पुरवठा निरीक्षण अधिकारी आणि पुरवठा निरीक्षक यांच्यावर निलंबनाची/ बडतर्फ ची कार्यवाही न झाल्यास दि.०४/११/२०२६ रोजी मंत्रालय मुंबई येथे आत्मदहन करण्यात येईल.

महोदय,

मी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सदर विषयासंदर्भात माहिती मागितली होती. त्यानंतर प्रथम अपीलाच्या अनुषंगाने मला उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत केवळ ३०५ लाभार्थी/कुटुंबांना धान्य मंजूर करण्यात आलेले आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

मात्र, दिनांक १७ जुलै २०२६ रोजीच्या संदर्भ क्रमांकानुसार पुरवठा विभाग, श्रीगोंदा यांनी दिलेल्या लेखी पत्रामध्ये नमूद केलेल्या RCMS संकेतस्थळावरील माहितीची पडताळणी केली असता, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटुंब (PHH) म्हणून सुमारे २००३ रेशन कार्डधारक कुटुंबांची निवड/नोंद झालेली असल्याचे दिसून येते.

त्यामुळे माहितीच्या अधिकारातून प्रथम अपीलामध्ये देण्यात आलेली ३०५ लाभार्थी/कुटुंबांची संख्या आणि RCMS प्रणालीमध्ये दिसून येणारी सुमारे २००३ प्राधान्य कुटुंबांची संख्या यामध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनास येत आहे.

सदर तफावतीची वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत RCMS प्रणालीमध्ये नोंद असलेल्या लाभार्थी/प्राधान्य कुटुंबांची संपूर्ण यादी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे मागण्यात आली. तथापि, सदर माहिती अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे, शासकीय RCMS प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीची पडताळणी करूनही संबंधित लाभार्थ्यांची संपूर्ण यादी उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारातून देण्यात आलेली माहिती व प्रत्यक्ष शासकीय प्रणालीमध्ये उपलब्ध असलेली माहिती यामध्ये नेमकी तफावत का आहे, याची वरिष्ठ स्तरावर चौकशी होणे आवश्यक आहे.

तसेच, यापूर्वी संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेल्या माहितीची अधिकृत शासकीय नोंदी व RCMS प्रणालीशी पडताळणी होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी संबंधित अधिकाऱ्यांची पाठराखण करीत आहेत किंवा त्यांना पाठीशी घालत आहेत, अशी शंका निर्माण होण्यास वाव आहे. त्यामुळे सदर बाबीची स्थानिक स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत नव्हे, तर वरिष्ठ व स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.

त्यामुळे माझ्या पुढील मागण्या आहेत :

१. श्रीगोंदा तालुक्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत RCMS प्रणालीमध्ये नोंद असलेल्या सर्व लाभार्थी/प्राधान्य कुटुंबांची संपूर्ण यादी संबंधित कालावधीसह उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत.

२. प्रथम अपीलाच्या उत्तरामध्ये केवळ ३०५ लाभार्थी/कुटुंबांना धान्य मंजूर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्या संख्येचा अधिकृत आधार, मंजुरी आदेश व संबंधित शासकीय नोंदी तपासण्यात याव्यात.

३. RCMS प्रणालीमध्ये सुमारे २००३ प्राधान्य कुटुंबांची नोंद/निवड दिसत असताना केवळ ३०५ लाभार्थी/कुटुंबांना धान्य मंजूर असल्याचे का नमूद करण्यात आले, याचे स्पष्ट लेखी स्पष्टीकरण संबंधित अधिकाऱ्यांकडून देण्यात यावे.

४. संबंधित 2003 लाभार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न, शासकीय नोकरी/व्यवसाय, मालमत्ता व इतर पात्रता निकषांची तपासणी करण्यात यावी.

५. लाभार्थी निवडीच्या प्रक्रियेत संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी त्यांच्या पदाचा किंवा अधिकाराचा गैरवापर केला आहे का, याची चौकशी करण्यात यावी.

६. माहितीच्या अधिकारातून देण्यात आलेली माहिती, RCMS प्रणालीतील माहिती, धान्य मंजुरीचे अभिलेख आणि संबंधित रेशन कार्डांची संख्या यांची स्वतंत्रपणे पडताळणी करण्यात यावी.

७. संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीची सत्यता व शासकीय अभिलेखांशी असलेली सुसंगती तपासण्यात यावी.

८. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत प्रत्यक्ष लाभ घेत असलेल्या सर्व लाभार्थी/कुटुंबांची अधिकृत यादी तपासण्यात यावी.

९. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी मागणी करूनही RCMS प्रणालीतील लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करून न दिल्याची बाब तपासण्यात यावी.

१०. संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक चुकीची, अपूर्ण अथवा दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे याची चौकशी करण्यात यावी.

११. जिल्हा पुरवठा अधिकारी संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांची पाठराखण करीत आहेत का किंवा त्यांना पाठीशी घालत आहेत का, याचीही स्वतंत्रपणे चौकशी करण्यात यावी.

१२.पदाचा गैरवापर, कर्तव्यातील निष्काळजीपणा किंवा संगनमत आढळल्यास संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी विभागीय तसेच लागू कायद्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी. चौकशीदरम्यान संबंधित नोंदी, अर्ज, कागदपत्रे, लाभार्थी यादी व डिजिटल रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचे निर्देश देण्यात यावेत.

१३. प्रथम अपीलिय अधिकारी यांनी माहिती नुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत अन्नसुरक्षा योजनेमध्ये नवीन लाभार्थ्यांचा समावेश करण्याबाबत चे आदेश पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी आदेशावर स्वतः स्वाक्षरी केलेली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत प्राधान्य कुटुंब (PHH) म्हणून लाभार्थी निवड करण्याचे तसेच RCMS प्रणालीमध्ये अर्ज मंजूर करण्याचे अधिकार पुरवठा निरीक्षण अधिकारी यांना कोणत्या अधिनियम, शासन निर्णय, शासन परिपत्रक, कार्यालयीन आदेश अथवा अधिकार प्रत्यायोजन आदेशाद्वारे प्रदान करण्यात आले आहेत? सदर अधिकार प्रदान करणाऱ्या आदेशाची प्रमाणित प्रत उपलब्ध करून द्यावी.

१४. सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशीचा अहवाल व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मला लेखी स्वरूपात देण्यात यावी.वरील सर्व बाबींचा विचार करता, माहितीच्या अधिकारातून प्रथम अपीलामध्ये देण्यात आलेली ३०५ लाभार्थी/कुटुंबांची संख्या आणि RCMS प्रणालीमध्ये दिसून येणारी सुमारे २००३ प्राधान्य कुटुंबांची संख्या यामध्ये गंभीर तफावत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. या तफावतीमागील वस्तुस्थिती स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे.

१५. तहसील कार्यालयातील RCMS प्रणालीमध्ये तहसीलदार श्रीगोंदा यांच्या अधिकारात असलेले लॉगिन पुरवठा निरीक्षण अधिकारी हे स्वत च्या नावे वापरले जात असल्याची माहिती समोर आलेली आहे. जर सदर लॉगिन पुरवठा निरीक्षण अधिकारी यांना वापरण्यास अधिकृतपणे देण्यात आले असेल, तर त्यासाठी कोणत्या सक्षम प्राधिकाऱ्याने, कोणत्या आदेशाने अथवा कोणत्या शासन निर्णय/परिपत्रकानुसार परवानगी दिली आहे, याची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.

१६.कुठलाही अर्ज न घेता फक्त आधार कार्ड आणि रेशन झेरोक्स च्या आधारे कुठलीही पडताळणी न करता झालेलं अन्नसुरक्षा योजनेची निवडीची चौकशी होणेबाबत.

सदर बाब अत्यंत गंभीर असून, तहसीलदार यांच्या नावाचे लॉगिन अन्य अधिकारी वापरत असल्यास त्याचा अधिकृत अधिकार, जबाबदारी व डिजिटल ऑडिट ट्रेल तपासणे आवश्यक आहे.

याच संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत (NFSA) कार्यालयास अर्ज प्राप्त नसतानाही सुमारे 2,003 प्राधान्य कुटुंब कार्डे व 22 अंत्योदय कार्ड लाभार्थींची निवड करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. यामुळे सदर लाभार्थी निवडीची प्रक्रिया नियमानुसार झाली आहे किंवा नाही, याबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे, तरी पुढील योग्य ती कार्यवाही होऊ पर्यंत हे rcms प्रणाली चे लॉगीन हे स्वत तहसीलदार यांनी वापर करावा हि विनंती.

त्यामुळे सदर प्रकरणाची जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून नव्हे तर मंत्रालय स्तरावरून स्वतंत्र, निष्पक्ष व वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश द्यावेत व संबंधित सर्व शासकीय अभिलेखांची पडताळणी/पुरवठा विभागाची दप्तर तपासणी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर संबधित पुरवठा निरीक्षण अधिकारी यांच्यावर निलंबनाची/ बडतर्फ ची कार्यवाही न झाल्यास दि.०४/११/२०२६ रोजी मंत्रालय मुंबई येथे आत्मदहन करण्यात येईल याची सर्वस जबाबदारी प्रशासनाची राहील.

आपला विश्वासू,

(श्री युवराज विठ्ठल पळसकर)

सोबत :

1) माहितीचा अधिकार अर्जाची प्रत.
2) प्रथम अपीलाची प्रत.
3) प्रथम अपीलामध्ये प्राप्त झालेल्या उत्तराची प्रत.
4) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या ३०५ पात्र लाभार्थ्यांची यादी .
5) ५.दि.३०/०६/२०२६ रोजीचा दप्तर तपासणी अर्ज विभागीय आयुक्त व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिलेला अर्ज.
6) दिनांक १७ जुलै २०२६ रोजीच्या पुरवठा विभाग,श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र.कावी/पुरवठा/१२९/२०२६ दि.१७/०७/२०२६
7) RCMS प्रणालीवरील संबंधित माहितीचे २००३ लाभार्त्यांची वेबसाईट वरील प्रिंटआउट यादी.

8) जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे RCMS प्रणालीवरील मागितलेल्या लाभार्थी यादीच्या अर्जाची प्रत.

माहितीस्तव प्रत:

१. मा. पोलीस निरीक्षक साहेब,
मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन,
मुंबई.